**मे. गंगामाऊली शुगर्स अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि., गट नं. ११५ व ११६, अशोक नगर, उमरी, ता. केज, जि. बीड या प्रस्तावित प्रकल्पामध्ये १५० केएलपीडी मोलॅसिस (बी व सी हेवी)/उसाच्या रसावर आधारित डिस्टिलरी युनिट व ३ मेगावॅट सहवीज निर्मिती प्लांट सुरू करणे बाबत दिनांक ०८/०७/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. गंगामाऊली शुगर्स अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि., गट नं. ११५ व ११६, अशोक नगर, उमरी, ता. केज, जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त: -**

---

मे. गंगामाऊली शुगर्स अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि., गट नं. ११५ व ११६, अशोक नगर, उमरी, ता. केज, जि. बीड या प्रस्तावित नवीन प्रकल्पामध्ये १५० केएलपीडी मोलॅसिस (बी व सी हेवी)/उसाच्या रसावर आधारित डिस्टिलरी युनिट व ३ मेगावॅट सहवीज निर्मिती प्लांट सुरू करणे बाबत दिनांक ०८/०७/२०२५ रोजी दुपारी १२:०० वाजता मे. गंगामाऊली शुगर्स अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि., गट नं. ११५ व ११६, अशोक नगर, उमरी, ता. केज, जि. बीड येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-५०/ २०२५ पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २५०६३०- एफटीएस-०२७७ दि. ३०/०६/२०२५ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. **श्री. शिवकुमार स्वामी**<br>अप्पर जिल्हादंडाधिकारी, बीड. | : | अध्यक्ष |
| २. **श्री. मनिष होळकर**<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | : | सदस्य |
| ३. **श्री. दिपक बनसोड**<br>उप प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना. | : | समन्वयक |

श्री. दिपक बनसोड, उप प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जालना यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. गंगामाऊली शुगर्स अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि., गट नं. ११५ व ११६, अशोक नगर, उमरी, ता. केज,

होळकर

जि. बीड यांच्या प्रस्तावित प्रकल्पामध्ये १५० केएलपीडी मोलॅसिस (बी व सी हेवी)/उसाच्या रसावर आधारित डिस्टिलरी युनिट व ३ मेगावॅट सहवीज निर्मिती प्लांट सुरू करणे बाबत पर्यावरणविषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. गंगामाऊली शुगर्स ॲण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि. यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दि. ०८/०५/२०२५ रोजी प्राप्त झाला. त्याअनूषंगाने मा. जिल्हाधिकारी बीड यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दि. ०८/०७/२०२५ वेळ-दूपारी १२.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. ०१/०६/२०२५ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हयातील संबंधित शासकीय कार्यालये, ग्रामपंचायत कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालीलप्रमाणे-

१. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, बीड.
३. व्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड.
४. तहसिलदार, तहसिल कार्यालय, केज, ता. केज, जि. बीड.
५. ग्रामपंचायत कार्यालय कोरेगाव, ता. केज, जि. बीड.
६. ग्रामपंचायत कार्यालय कानडी माळी, ता. केज, जि. बीड.
७. ग्रामपंचायत कार्यालय कोटी, ता. केज, जि. बीड.
८. ग्रामपंचायत कार्यालय उमरी, ता. केज, जि. बीड.
९. ग्रामपंचायत कार्यालय मस्साजोग, ता. केज, जि. बीड.
१०. ग्रामपंचायत कार्यालय टाकळी, ता. केज, जि. बीड.
११. ग्रामपंचायत कार्यालय जाधवजवळा, ता. केज, जि. बीड.
१२. ग्रामपंचायत कार्यालय शिरपुरा, ता. केज, जि. बीड.
१३. ग्रामपंचायत कार्यालय डोणगाव, ता. केज, जि. बीड.
१४. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, प्लॉट नं. पी-३/१ व पी-३/२, अतिरीक्त एमआयडीसी फेज-२, जालना.
१५. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, भूखंड क्रं. ए-४/१, एमआयडीसी चिकलठाणा, छत्रपती संभाजी नगर.
१६. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
१७. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-३२.
१८. प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पूर्व विंग, नविन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर.

होळकर

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, जालना येथे तीन सूचना इमेलद्वारे खालीलप्रमाणे प्राप्त झाली आहेत त्याची नोंद घेण्यात आली आहे व सोबत जोडण्यात येत आहे.

१. श्री. व्हि. सुनंदा रेडडी, पर्यावरणवादी, तेलंगना राज्य यांची सुचना दि. ०३/०७/२०२५ रोजीच्या इमेलद्वारे प्राप्त.
२. श्री. रंगाराव कोठाकोंडा, सेव अर्थ, मेट्रो अर्बन व रूरल डेव्हलपमेंट सोसायटी, तेलंगना राज्य यांची सुचना दि. ०८/०७/२०२५ रोजीच्या इमेलद्वारे प्राप्त.
३. श्री. पल्ले नवीन कुमार, युनायटेड सोशल सर्व्हिसेस सोसायटी, तेलंगना राज्य यांची सुचना दि. ०८/०७/२०२५ रोजीच्या इमेलद्वारे प्राप्त.

तरी उपस्थित नागरिकांमधून कोणास कांही लेखी/तोंडी आक्षेप/टिका/टिप्पणी नोंदवायचे असतील तर ते सदर प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर नोंदवू शकतात. तदनंतर त्यांनी मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

प्रकल्प सल्लागार, मे. इक्विनॉक्स एनव्हायरोमेंटस (इं) प्रा.लि., कोल्हापुर यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की-

- प्रस्तावना.
- पर्यावरण आघात मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन.
- प्रकल्पाचे स्थळ, प्रकल्पाचे गुगल नकाशा, प्रकल्पाचा तपशिल,प्रकल्पाचा आराखडा, प्रकल्पाचे अध्ययन क्षेत्र, प्रकल्प स्थळाची सध्याची छायाचित्रे.
- प्रस्तावित प्रकल्पाची प्रमुख वैशिष्टये, प्रस्तावित प्रकल्पाची मुलभूत आवश्यकता.
- पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास,स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती.
- अभ्यास स्थळाची माहिती,अध्ययन क्षेत्रातील वायूची गुणवत्ता तपासणी, वायू गुणवत्तेचा निष्कर्ष.
- अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता तपासणी, ध्वनी गुणवत्तेचा निष्कर्ष
- अध्ययन क्षेत्रातील पाणी गुणवत्ता तपासणी, भुतलावरील पाणी गुणवत्तेचा निष्कर्ष, भुजल पाणी गुणवत्तेचा निष्कर्ष.
- अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता तपासणी माती गुणवत्तेचा निष्कर्ष.
- जैव पर्यावरण, अध्ययन क्षेत्रातील जमिनीचे वर्गीकरण.
- सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, सामाजिक आर्थीक पर्यावरण, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा.
- ऑनलाईन निरीक्षण प्रणाली (OCEMS) पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन.
- घनकचरा व्यवस्थापन.
- हरितपटटा विकास व त्याचे छायाचित्रे, व्यावसायिक निरीक्षण कार्यक्रम तपशील.
- पर्यावरण व्यवस्थापन कक्ष माहिती, सामाजिक बांधिलकी, सामाजिक आर्थीक पर्यावरण.

- सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा.
- विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. शिवकुमार स्वामी, अप्पर जिल्हादंडाधिकारी, बीड तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, सदर प्रकल्पासंबंधी जर कुणाला काही प्रश्न, सुचना, टिप्पणी, विचार इ. मांडायचे असतील तर ते त्यांनी त्यांचे नांव व गावाचे नांव सांगून विचारावेत.

जाहीर लोकसूनावणी दरम्यान उपस्थित नागरिकांनी सदर प्रकल्पा संबधी काही प्रश्न उपस्थित केले त्याबाबतची प्रकल्प प्रतिनिधी/ सल्लागार कडून उत्तर देण्यात आले ते खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | सुनावणी दरम्यान केलेले प्रश्न, टिप्पणी, आक्षेप, सुचना इत्यादी व सदर व्यक्तीचे नाव व गावाचे नाव. | उदयोगाच्या प्रतिनिधी/पर्यावरण सल्लागार यांनी दिलेले आश्वासन/उत्तरे. |
|---|---|---|
| १. | **श्री. जयदिप महादेव वायबसे, रा. टाकळी, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदर प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्पामधून दररोज अंदाजे किती प्रमाणात अल्कोहोल तयार होईल. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, या नविन आसवणी प्रकल्पाची उत्पादन क्षमता १५० केएलपीडी एवढी आहे. यामध्ये आरएस, इथेनॉल व इएनए यांचे उत्पादन घेण्यात येईल. |
| २. | **श्री. श्यामसुंदर तुकाराम दिवाने, रा. जाधव जवळा, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, या नविन आसवणी प्रकल्पामुळे आजुबाजूच्या गावातील नागरिकांना काय फायदा होईल. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, या प्रस्तावित प्रकल्पामध्ये प्रत्यक्षरित्या एकुण ७५ नागरिकांना रोजगार देण्यात येणार आहे तसेच सदर प्रकल्पामध्ये अप्रत्यक्षरित्या जवळपास १०० ते १५० नागरिकांना त्यांच्या कौशल्य क्षमतेनुसार रोजगार देण्यात येणार आहे यामध्ये आजुबाजूच्या स्थानिक नागरिकांनाच प्राधाण्य दिले जाणार आहे. तसेच आजुबाजूच्या गावातील सामाजिक व पर्यावरणीय विकासासाठी सीएसआर निधी एकूण रू. २.६७ कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे यामुळे नक्कीच फायदा होईल. |
| ३. | **श्री. भिमाशंकर चंद्रकांत पटणे, रा. डोणगांव जवळा, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदर प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्प उभारण्यासाठी अंदाजे किती खर्च लागाणार आहे. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्प उभारण्यासाठी एकूण रू. १७५ कोटी एवढी गुंतवणूक करण्यात आलेली आहे यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान व ऑटोमेशन व्यवस्थापन नियोजीत आहे. |

होळकर

| | | |
|---|---|---|
| ४. | **श्री. धनराज लक्ष्मण तांदळे, रा. कोरेगाव, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदर प्रस्तावित नवीन अल्कोहोल प्रकल्पामध्ये स्पेंट वॉश किती प्रमाणात निर्माण होइल व त्याची विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प प्रवर्तकांने काय काय उपाययोजना केलेल्या आहेत. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्पामधून एकूण ८ कि.ली./कि.ली. अल्कोहोल एवढा रॉ स्पेंटवॉश तसेच १.६ कि.ली./कि.ली. अल्कोहोल इतका कॉन्सनट्रेट स्पेंटवॉश ड्राय करून त्याची पावडर केली जाईल. |
| ५. | **श्री. सुरज बाबासाहेब शिंदे, रा. भारज, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदर प्रस्तावित प्रकल्पामध्ये निर्माण होणा-या सांडपाण्यासाठी काय काय उपाययोजना केलेल्या आहेत याबाबत सांगावे. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर प्रकल्प हा Zero Liquid Discharge (ZLD) वर आधारीत आहे तसेच आसवणी प्रकल्पामधून निघणारे स्पेंटवॉश एमईई मध्ये इव्हॅपोरेट व कॉन्सनट्रेट केला जाईल व कॉन्सनट्रेट स्पेंटवॉश ड्राय करून त्याची पावडर केली जाईल व इतर सांडपाणी जसे की, कुलिंग ब्लोडाऊन, बॉयलर ब्लोडाऊन, लॅब व वॉशिंग हे अत्याधूनिक सीपीयु (Condensate Polishing Unit) या यंत्रणेमध्ये ट्रीट करून प्रक्रियाकृत सांडपाण्याचा जास्तीत जास्त पूर्नवापर करण्यात येईल त्यामूळे कूठलेही सांडपाणी कारखाण्याच्या बाहेर जाणार नाही. |
| ६. | **श्री. गणेश जय दगडू, रा. पिंपळगाव, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदरच्या नवीन प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषणाचा काही त्रास होईल का. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, कारखान्याच्या आतमध्ये जसे की, बॉयलर, टर्बाईन, पंप्स, कॉम्प्रेसर्स, बॉयलर हाऊस, ट्रक वाहतूक अशा ठिकाणी काम करणा-या कामगारांना ध्वनी प्रदूषण त्रास संभवतो त्यासाठी कामगारांना वैयक्तिक संरक्षणात्मक उपकरणे जसे की, आयसोलेशन, सेपरेशन इन्सुलेशन, पीपीई, इअर प्लग इ. पुरविल्या जातात तसेच याव्यतिरीक्त इतरही अधिकच्या सुविधा/व्यवस्था केल्या जातात यामुळे कारखान्याच्या बाहेर ध्वनी प्रदूषण होत नाही. त्यामुळे आजुबाजूच्या स्थानिक नागरिकांना ध्वनी प्रदुषणाचा त्राव होत नाही. |
| ७. | **श्री. अशोक कोळेकर, रा. कोळगाव, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदरच्या नवीन प्रकल्पामध्ये बॉयलरसाठी कोणते इंधन वापरले जाईल व यामुळे प्रदूषण होणार नाही यासाठी कोणते उपकरण अथवा काय उपाययोजना केल्या जातील. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्पामध्ये ४० टन टीपीएच एवढया क्षमतेचे बॉयलर वापरण्यात येणार असून बॉयलरसाठी ईएसपी (Electrostatic Precipitator) व त्यासाठी ७० मी. उंचीची चिमणी बसविण्यात येणार आहे व यामध्ये बगॅस इंधन म्हणून |

कोळेकर

| | | |
|---|---|---|
| | | वापरण्यात येणार आहे. यामुळे निघणारे उत्सर्जन बाहेर जाणार नाही व हवेचे प्रदूषण होणार नाही. |
| ८. | **श्री. शिवाजी विश्वनाथ देशमुख, रा. जवळा, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदरच्या नवीन आसवणी प्रकल्प साधारणता: किती दिवस सुरू राहणार आहे. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, सदर प्रस्तावित नवीन आसवणी प्रकल्प हा जवळपास ३३० दिवस चालू राहणार आहे. यामध्ये स्पेंटवॉश हा कॉन्सनट्रेशन व ड्राईंग करण्यात येईल यामुळे सदर स्पेंटवॉश ची १०० टक्के विल्हेवाट होईल. तसेच ३० दिवस हे देखभालीसाठी लागतात त्यामूळे ३३० दिवस अन्यथा सदर प्रकल्प हा वर्षभर चालू शकतो. |
| ९. | **श्री. नंदकिशोर सहदेव तपसे, रा. चंदन सावरगाव, ता. केज, जि. बीड** यांनी विचारले की, सदरच्या नवीन आसवणी प्रकल्पामुळे येथील नागरिकांना किती रोजगार मिळणार आहे. | **यावर पर्यावरण सल्लागार**, यांनी सांगितले की, या प्रस्तावित नवीन प्रकल्पामध्ये प्रत्यक्षरित्या एकूण ७५ नागरिकांना रोजगार देण्यात येणार आहे व स्थानिक नागरिकांनाच प्राधाण्य दिले जाणार आहे.तसेच सदर प्रकल्पामध्ये अप्रत्यक्षरित्या जवळपास १०० ते १५० लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. |
| १०. | **श्री. व्ही. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा** यांनी सर्वप्रथम प्रकल्प व्यवस्थापनाला शुभेच्छा आणि समर्थन दिले. औद्योगिक विकासाला पाठिंबा देणारे ते पहिले पर्यावरणवादी असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच या उद्योगाला बिनशर्त पर्यावरणीय मंजुरीसाठी MoEF&CC कडे शिफारस करत असल्याचे नमूद केले. तसेच प्रकल्प प्रवर्तकांना त्यांनी काही सुचना केल्या जसे की, पर्यावरणाची काळजी घेणे, पर्यावरण सुरक्षेसाठी त्यांनी कारखान्यात पाणी साठविण्याची सूचना केली. पाणी साठवण रचना तयार करणे, गावरस्ते तसेच गावातील वृक्षारोपण करणे तसेच स्थानिक नागरिकांना रोजगारामध्ये जास्तीत जास्त संधी देण्यात यावी असेही त्यांनी सुचविले. | **यावर श्री. दिपक बनसोड, उप प्रादेशिक अधिकारी, जालना** यांनी याबाबत सांतिले की, आपल्या सूचनांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे. |

तदनंतर श्री. शिवकुमार स्वामी, अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी समिती यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या वतीने मे.

गंगामाऊली शुगर्स अ‍ॅण्ड अलाईड इंडस्ट्रीस प्रा. लि., गट नं. ११५ व ११६, अशोक नगर, उमरी, ता. केज, जि. बीड या प्रस्तावित प्रकल्पामध्ये १५० केएलपीडी मोलॅसिस (बी व सी हेवी)/उसाच्या रसावर आधारित डिस्टिलरी युनिट व ३ मेगावॅट सहवीज निर्मिती प्लांट उत्पादन करणे बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. मे. इक्विनॉक्स एनव्हायरोमेंटस (इं) प्रा.लि., कोल्हापुर यांच्या पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रकल्पा बाबतचे सादरीकरण केलेले आहे. सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी दरम्यान येथील स्थानिक नागरिकांनी त्यांची प्रश्न काही सूचना येथे मांडलेल्या आहेत. तसेच काही पर्यावरणीय संस्था यांनी सुध्दा त्यांच्या सुचना येथे मांडलेल्या आहेत व त्यांची लेखी निवेदणे देखील येथे प्राप्त झाली आहेत. उपस्थित केलेल्या प्रश्न/सूचना/टिका व त्यावर प्रकल्पाचे पर्यावरणीय सल्लागार यांनी दिलेली उत्तरे यांची येथे नोंद घेण्यात आलेली आहे तसेच या सर्व बाबींचा सविस्तर रीतीने इतिवृत्तात समाविष्ट करण्यात येईल व सदर प्रस्ताव पर्यावरण मंजुरीसाठी पुढे पाठविण्यात येईल. तदनंतर शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानून जाहीर लोकसूनावणी संपन्न झाली.

| | | |
|---|---|---|
| **दिपक बनसोड** | होळकर<br>**मनिष होळकर** | **शिवकुमार स्वामी** |
| (समन्वयक) | (सदस्य) | (अध्यक्ष) |
| तथा | तथा | तथा |
| उप प्रादेशिक अधिकारी, | प्रादेशिक अधिकारी, | अप्पर जिल्हादंडाधिकारी बीड. |
| म.प्र.नि. मंडळ, जालना. | म.प्र.नि. मंडळ, छ. संभाजीनगर. | |